महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
जिल्हा माहिती कार्यालय, लातूर
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, उत्तर बाजूस लातूर-4 135 12

वृत्तपत्राचे नाव : विकास धारा
दिनांक : २ डिसेंबर २०२२

# महिला आयोगाच्या अध्यक्षांनी केले
## लातूर जिल्ह्यातील महिलाविषयक कामांचे कौतुक !







महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
**जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, उत्तर बाजूस लातूर-4 135 12

वृत्तपत्राचे नाव : यशवंत दिनांक : २ डिसेंबर २०२२

# पीडित महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी महिला आयोग आपल्या दारी उपक्रम



लातूर / प्रतिनिधी- अन्याय झालेली प्रत्येक महिला राज्य महिला आयोगाच्या मुंबईच्या कार्यालयात येऊ शकत नाहीत. ही अडचण लक्षात घेऊन महिला आयोगाच्यावतीने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन, महिलांच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी 'महिला आयोग आपल्या दारी' ही मोहीम सुरु केली आहे, अशी माहिती आयोगाच्या राज्याध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

चाकणकर म्हणाल्या, राज्यात महिलांनी साडी परिधान करावी, कोण म्हणतं सलवार चांगला दिसतो, कोण एखाद्या तरुणीस कपाळावर टिकली लाव असा उपदेश करतो. महिलांचे कर्तृत्व टिकलीवरून ठरवू नका, त्यांचे कर्तृत्व पहा. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई यांनी कर्तृत्व सिद्ध केले, तेव्हा त्यांच्या कपाळावर टिकली होती का, असा सवाल करून टिकली लाव म्हणणाऱ्या मनुवादी वृत्तीचा त्यांनी निषेध केला.

राज्यातील महिलांवर अन्याय होणार नाहीत, अत्याचार होणार नाहीत, यासाठी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व त्या - त्या विभागातील अधिकाऱ्यांना दक्ष राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. सोशल मीडियातून चुकीच्या पद्धतीने स्वतः व्यक्त होणाऱ्या मुले - मुली शोधून त्यांच्या पालकांना बोलावून सामार पत्र प्रमाणपत्र देण्याच्या लातूर पोलिसांच्या कार्याचे चाकणकर यांनी कौतुक केले. मिसिंगसंदर्भात मुली, महिलांच्या तक्रारीनंतर पोलीस तत्परता दाखवितात, त्यांचे कौतुक केले. मिसिंग सेलला तशा सूचना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कोरोनानंतर बालविवाह मोठ्या प्रमाणावर वाढले असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा बालविवाहप्रसंगी उपस्थित राहून अक्षता टाकणाऱ्या स्थानिक लोकप्रतिनिधींवर कारवाई करण्याच्या सूचना महिला आयोगाने दिल्या आहेत. बालविवाह होणार नाहीत, यासाठी दक्षता घेण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बालसंगोपन योजनेतून अनुदान दिले जात नाही. कोरोनात निधन पावलेल्या व्यक्तीस ५० हजार रुपयांची मदत दिली जात नाही. या संदर्भात महिनाभरात प्रश्न निकाली काढण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

पत्रकार जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी., पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
जिल्हा माहिती कार्यालय, लातूर
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, उत्तर बाजूस लातूर-4 135 12

वृत्तपत्राचे नाव : एकमत
दिनांक : २ डिसेंबर २०२२

# मिसिंग केसेस तातडीने हाताळा

▶राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे निर्देश



लातूर : प्रतिनिधी

संपूर्ण राज्यभरात मिसिंगच्या केसेस वाढत आहेत. प्रत्येक मिसिंग केस म्हणून नोंद झालेल्या व्यक्ती नंतरच्या प्रकरण तपासानंतर किती भयावह प्रकार घडला हे सर्वांच्या समोर आले आहे. त्यामुळे मिसिंगच्या केसेस तातडीने हाताळाव्यात, असे निर्देश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी गुरुवारी येथे पत्रकार परिषदेत बोलताना दिले.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या दोन दिवसाच्या लातूर जिल्हा दौऱ्यावर होत्या. गुरुवारी दुपारी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेस जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

एखादी घटना घडल्यानंतर त्याचा तपास केला जातो परंतु, घटना घडू नये, यावर काम केले पाहिजे, असे नमूद करून रुपाली चाकणकर म्हणाल्या, राज्यातील मिसिंग केसेससाठी राज्य महिला आयोग जानेवारीपासून पाठपुरावा करीत आहे. मिसिंग सेल ॲक्टिव्ह झाला पाहिजे. मिसिंग केसेस तातडीने हाताळले तर पुढील अनुचित घटना टाळता येऊ शकतात, असेही त्या म्हणाल्या.

महिला आर्थिक विवंचनेत असतात किंवा त्यांच्याकडे माहितीचा अभाव असतो. म्हणून राज्य महिला आयोगाने महिला आयोग आपल्या दारी, हा उपक्रम सुरू केला आहे. यामुळे महिलांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे नमूद करून रुपाली चाकणकर म्हणाल्या, [illegible], अवैध गर्भपात रोखण्यासाठी सोनोग्राफी सेंटरची तपासणी करणे, हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार, मानवी तस्करी, ऊसतोड कामगार महिलांची पाहणी, आदी काम करीत असतानाच महिलांना सायबर अभियान, बालसंगोपनासह शासनाच्या महिलाविषयक विविध योजनांची माहिती देणे, आदी कामे केली जात आहेत.

## इतर जिल्ह्यांच्या तुलनेत लातूरचे काम उल्लेखनीय

केंद्र सरकार असो की, राज्य सरकार यांनी महिलांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ज्या ज्या योजना, उपाययोजना दिलेल्या आहेत, त्या राबविण्यात लातूर जिल्हा आघाडीवर आहे. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत लातूरचे काम उल्लेखनीय आहे. लातूरचे प्रशासन महिलांच्या प्रश्नावर उत्कृष्ट काम करीत आहे. लातूर भागातून येणाऱ्या तक्रारी इतर जिल्ह्यांपेक्षा खूप कमी असल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर म्हणाल्या.

## महिलांना मोफत सीटीबस प्रवास, राज्यातील आदर्श उपक्रम

लातूरमध्ये महिलांना मोफत सीटीबस प्रवासाचा उपक्रम राबविला जातो. हा राज्यातील एक आदर्श उपक्रम आहे. हा अभिनव उपक्रम कसा राबवला, कोणत्या योजनेतून राबवला, हा उपक्रम राबवणे परवडते काय?, याचा सविस्तर अहवाल मागविला आहे. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो अहवाल राज्य शासनासमोर मांडून महिलांना मोफत सीटीबस प्रवास देण्याचा हा उपक्रम संपूर्ण राज्यभरातील महिलांसाठी राबविण्यासाठी प्रयत्न करू, असे रुपाली चाकणकर म्हणाल्या.

**'सोशल मीडिया वॉचर' उपक्रम राज्यभर राबविण्याच्या सूचना करणार** पोलीस विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'सोशल मिडिया वॉचर' उपक्रमाचेही त्यांनी यावेळी कौतुक केले. बदनामीकारक छायाचित्रे, लेखन यामुळे होणारी महिलांची बदनामी टाळण्यासाठी या उपक्रमांतर्गत पोलिसांकडून समाज माध्यमावर लक्ष ठेवले जाते. तसेच आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांविरुद्ध स्वतःहून कारवाई केली जाते. लातूर जिल्ह्यातील हा उपक्रम राज्यात इतरही जिल्ह्यामध्ये राबविण्याची सूचना करणार असल्याचे श्रीमती चाकणकर यांनी यावेळी सांगितले.